॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१८ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात वादळामुळे विद्यापीठ परिसरात वृक्षांचे आणि सोलर पॅनलचेही नुकसान झाले. त्यावेळी विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या दैनिक वेतनिक कर्मचाऱ्यांनी तत्परतेने काम केल्याबद्दल कुलगुरू प्रा. व्ही. एल  माहेश्वरी यांनी संवाद साधत कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाविषयी जी आस्था बाळगत तत्परतेने वाहतुकीसाठी रस्ते मोकळे करून दिल्याबद्दल विशेष कौतुकोद्गगार केले.

आज दि. १८ जून रोजी विद्यापीठात, बांधकाम विभागातील, उद्यान, सुरक्षा रक्षक, पाणीपुरवठा  तसेच विद्युत विभागात कार्यरत असणाऱ्या दैनिक वेतनिक कर्मचाऱ्यांशी कुलगुरू महोदयांनी संवाद साधला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, प्रभारी कार्यकारी अभियंता एस.आर. पाटील, उपअभियंता आर. आय. पाटील, विनय देसले व अश्विनी पाटील उपस्थित होते.

त्यावेळी कुलगुरू प्रा. माहेश्वरी म्हणाले की, वेळेचे कोणतेही बंधन न मानता कार्यतत्परतेनेविद्यापीठात येणाऱ्या अभ्यागतांची व विद्यार्थ्यांची अडचण होवू नये म्हणून आपण प्रचंड मेहनत घेवून कर्मचाऱ्यांनी केलेले काम हे प्रेरणादायी आहे अशीनिष्ठा आपण कायम ठेवावी असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण चंदनकर यांनी केले.

..............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १८ जून, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता